POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-१९८ ● मुंबई, मंगळवार, १८ फेब्रुवारी २०२५ ● पृष्ठ-४ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## सिन्नर महाविद्यालयात थालेसेमियामुक्त महाराष्ट्र कार्यशाळा संपन्न










**■नाशिक। प्रतिनिधी :**

मराठा विद्या प्रसारक समाजाचे गुरुवर्य मामासाहेब दांडेकर कला, भगवंतराव वाजे वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय व आश्रय सामाजिक, सांस्कृतिक, व शैक्षणिक ट्रस्ट ठाणे यांच्या संयुक्त विद्यमानाने दिनांक १० फेब्रुवारी २०२५ रोजी थालेसमिया ह्या आजाराबाबत जनजागृती कार्यकाळात संपन्न झाली. थालेसेमीया फ्री महाराष्ट्र हे ब्रिद वाक्य घेऊन अवघ्या महाराष्ट्राला या आजाराबद्दल जागृत करणे हे या कार्यशाळेचे मुख्य उद्दिष्ट होते. आश्रय ट्रस्ट व मराठा विद्या प्रसारक समाजाचे सिन्नर महाविद्यालय यांच्यामध्ये सामान्य कराराच्या माध्यमातून शैक्षणिक वर्ष २०२४ - २५ मध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन झालेले आहे. सिन्नर महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जडणघडणीबरोबरच त्यांच्या आरोग्याची ही काळजी नेहमी घेतली जाते. त्या अंतर्गत ११ नोव्हेंबर २०२४ रोजी महाविद्यालयात आश्रय ट्रस्ट व ए. के. डायग्नोसस्टिक यांच्या पुढाकाराने २५० विद्यार्थ्यांची रक्त तपासणी करण्यात आली होती. या तपासणीमध्ये विद्याथ्यार्नंच्या रक्तातील एचबी चे प्रमाण शोधणे हे होते. या तपासणीमध्ये शिक्षकांचाही सहभाग होता. या तपासणीतून आलेल्या परीक्षणातून असे निदर्शनात आले की, महाविद्यालयातील बऱ्याच विद्यार्थ्यांमध्ये एचबी चे प्रमाण कमी आहे. यामध्ये विद्यार्थिनींचां मोठ्या प्रमाणात समावेश आहे. यावर उपाययोजना व्हावी व विद्यार्थ्यांना आहार विषयक योग्य मार्गदर्शन मिळावे यासाठी या एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य श्री आर वी पवार ह्यांनी कार्यशाळेचे अध्यक्षपद भूषवले. त्याचबरोबर त्यांच्या समवेत कार्यशाळेसाठी उपस्थित असलेले प्रमुख पाहुणे व थालेसेमिया तज्ञ मार्गदर्शक प्राध्यापक प्रकाश पांगम तसेच आहार तज्ञ डॉ. सोनल काठोळे व ए के डायग्नोस्टिकचे संचालक व प्रमुख प्रयोगशाळा तंत्रज्ञ श्री रविंद्र कुलकर्णी ही उपस्थित होते.

सदर कार्यशाळेचे उद्घाटन होऊन पहिले सत्र प्राध्यापक पांगम यांनी घेतले. त्यांनी थालीसेमिया या आजाराविषयी विद्यार्थ्यांना शास्त्रोक्त माहिती दिली. तसेच या आजारावर अद्याप कोणताही इलाज नसल्याने ह्या आजाराचा प्रसार होऊ नये यासाठी तरुणांनी पुढाकार घ्यावा असे आवाहन केले. थालेसमीया मायनर व्यक्तीने दुसऱ्या थालेसमीया मायनर व्यक्तीबरोबर विवाह केल्यास त्यांना होणारे अपत्य हे थालेसमीया मेजर रुग्ण असतो. अश्या रुग्णांना दर महिन्याला रक्त पुरवठा करावा लागतो. ही उपचार पद्धती खुप त्रासाची व खर्चिक आहे. यासाठी सर्व तरुणांनी विवाहपूर्वी रक्त तपासणी जरूर करावी असे त्यांनी पटवून सांगितले.

कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रात डॉ. व आहार तज्ञ सोनल काठोळे यांनी विद्यार्थ्यांना रक्तातील एचबी म्हणजेच लोहाचे प्रमाण कसे वाढवावे यासाठी मार्गदर्शन केले. रोजचा आहार व दैनंदिन जीवनशैली किती महत्त्वाची आहे हे त्यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले. त्यासाठी संतुलित आहार घेणे गरजेचे आहे व कोणत्या अन्न घटकांतून कोणते महत्त्वाचे घटक आपल्या शरीराला मिळतात हे त्यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर सांगितले.

कार्यशाळेच्या तिसऱ्या सत्रात ए के डायग्नोस्टिकचे कार्यशाळा तंत्रज्ञ श्री. रविंद्र कुलकर्णी यांनी थालेसेमिया मायनर विद्यार्थ्यांची रक्त तपासणी केली. तसेच त्यांच्या समवेत आलेल्या त्यांच्या पालकांची ही रक्त तपासणी केली. सदर चाचणी व त्यांच्या वरील उपचार करण्यासाठीच्या सर्व आर्थिक खचार्ची जबाबदारी आश्रय ट्रस्ट ठाणे यांनी घेतलेली आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्राचार्य श्री. आर. वि. पवार यांनी आश्रय ट्रस्ट व ए के डायग्नोस्टिक यांनी घेतलेल्या श्रमासाठी व सहकायार्साठी दिलगिरी व्यक्त केली. तसेच महाविद्यालयात इथून पुढे असेच समाज उपयोगी व विद्यार्थी केंद्रबिंदू स्थानी मानून आणखी कार्यक्रमांची योजना करू असे आश्वासन आपल्या मनोगतात मांडले.

सदर कार्यशाळेचे नियोजन हे महाविद्यालयातील हेल्थ क्लब समिती यांनी केले होते. त्यासाठी हेल्थ क्लबचे प्रमुख प्रा. वाळुंज यांनी व त्यांच्या समवेत कमिटी सदस्य डॉ.एम. सोनवणे, श्री आर एम सोनवणे, प्रा. खुर्चे, प्रा. श्रीमती गायकवाड, तसेच आश्रय ट्रस्ट सामंजस्य करार समन्वयक प्रमुख प्रा. श्रीमती सूर्यवंशी डी एस यांनी परिश्रम घेतले. सदर कार्यक्रमासाठी मोठ्या प्रमाणात विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

## पाच वर्षांत ६० नागरी सहकारी बँका नामशेष

**■मुंबई। प्रतिनिधी :**




न्यू इंडिया को-ऑपरेटिव्ह बँकेवर रिझर्व्ह बँकेने अलीकडेच केलेल्या कारवाईमुळे नागरी सहकारी बँकांचे आर्थिक आरोग्य आणि ढिसाळ कारभाराचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला. दरसाल डझनाहून अधिक बँकांना परवाना गमवावा लागून, मार्च २०२४पर्यंत गेल्या पाच वर्षांत राज्यातील तब्बल ६० नागरी सहकारी बँका नामशेष झाल्या आहेत. ही संख्या पाहता रिझर्व्ह बँकेच्या कारवाईची गती वाढल्याचे दिसत असले तरी उद्दाम बँकचालकांना वठणीवर आणण्यात ती कमी पडली आहे. उलट सामान्य सभासद, ठेवीदारांनाच अधिक झळ सोसावी लागल्याचे चित्र आहे.

सहकाराची मोठी परंपरा असलेल्या महाराष्ट्रात, २०२४ सालात ४९६ नागरी बँका कार्यरत होत्या. ठेव विमा आणि पत हमी महामंडळाकडे (डीआयसीजीसी) मार्च २०२४ अखेर नोंदणीकृत बँकांची संख्या हे दर्शविते. २०२४ मध्ये तीन सहकारी बँकांचा परवाना रद्दबातल केला गेला, ज्यात सिटी को-ऑपरेटिव्ह बँक आणि जयप्रकाश नारायण नागरी सहकारी बँकेचा समावेश आहे. त्या आधी २०१९-२० ते मार्च २०२४ पर्यंत पाच वर्षांत ६० हून अधिक नागरी सहकारी बँकांचा परवाना रद्द केला गेला किंवा त्यांचे अन्य बँकेत विलीनीकरण होऊन त्या नामशेष झाल्या. एकट्या २०२२-२३ मध्ये देशभरात १७ नागरी सहकारी बँका बुडाल्या. ही आजवरची सर्वाधिक संख्या आहे. सध्याच्या घडीला रिझर्व्ह बँकेद्वारे कलम '३५ अ'अंतर्गत निर्बंध लागू असलेल्या नागरी बँकांची संख्या ४०च्या घरात आहे. नियामक म्हणून रिझर्व्ह बँकेकडून वर्षागणिक शेकडो बँकांवर आर्थिक दंड लावला जाण्याची कारवाई होते.

'न्यू इंडिया'वर निर्बंधांच्या निर्णय झाला त्याच दिवशी पाच नागरी बँकांवर आर्थिक दंडाची कारवाई झाली. धुळे आणि नंदूरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला २५ हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला. त्या आधी मुंबईतील प्रोगेसिव्ह को-ऑपरेटिव्ह बँकेवर १ लाखांचा, तर भारत को-ऑपरेटिव्ह बँकेवर १५ लाखांच्या दंडाचा वार चालविला गेला. रिझर्व्ह बँकेच्या नियमन तत्परता व देखरेखीतून २०२३-२४ मध्ये ६४ बँकांकडून आर्थिक दंडापोटी ७४.१ कोटी रुपये वसूल करण्यात आले. त्या आधीच्या वर्षात हे प्रमाण ३३.१ कोटी रुपये असल्याचे रिझर्व्ह बँकेच्या वार्षिक अहवालातून स्पष्ट होते. उल्लेखनीय म्हणजे यात नागरी सहकारी बँकांकडून झालेल्या दंडवसुलीचा समावेश नसून, त्याचे प्रमाण याहून जास्त असेल, असे जाणकारांचे म्हणणे आहे.

नागरी बँकांच्या कारभारात सुधारणा होऊन त्या ताळ्यावर याव्यात या रोखाने रिझर्व्ह बँकेच्या दंडात्मक कारवाया होतात. त्यामुळे एकाच बँकेवर वर्षातून दोन-तीनदा नियमपालनांत हयगय म्हणून दंडवसुली झाली अशीही उदाहरणे आहेत, असे सहकारी बँकिंगमधील ज्येष्ठ कार्यकर्ते विद्याधर अनास्कर म्हणाले. 'न्यू इंडिया'बाबत तर बँकेच्या सेवकांनी जागल्याच्या भूमिकेतून पत्राद्वारे बँकेतील काळेबेरे कळविले आणि पर्यवेक्षणांतून ते खरे असल्याचे लक्षात येऊनही चार वर्षांनी कारवाई केली. एकाच कुटुंबातील चार जणांचा संचालक मंडळात समावेश हा सपशेल नियमभंगही खपवून घेतला गेला. संचालक मंडळ बरखास्त करून बँक प्रशासकाची हाती सोपवण्याची कारवाई खूप आधीच व्हायला हवी होती, असे अनास्कर यांनी नमूद केले. बँकेच्या संचालकांकडून उघड नियमभंग दिसत असताना, त्यांच्या राजकीय हितसंबंधांमुळे त्यांच्यावरील कारवाईस उशीर झाला, या संशयालाही त्यामुळे जागा निर्माण होते. ही बँक प्रशासकाहाती सोपवण्याचे पाऊल खूप आधीच टाकले जायला हवे होते, असे ते म्हणाले.

"सभासद, ठेवीदारांना नागरी बँकेच्या संचालकांचे साटेलोटे, राजकीय लागेबांधे यांतून होणाऱ्या आर्थिक गैरव्यवहारांची कल्पना नसते. न्यू इंडियाबाबत तिचा गेल्या दोन वर्षांतील तोटा सोडता, इतर कामगिरीचे निकष चांगलेच होते. त्यामुळे 'कलम ३५ अ'द्वारे निर्बंध आणून, बँकेतील ठेवी काढता येण्याची सोय नसणे हा सर्वसामान्यांवर आघातच ठरतो."

**- विद्याधर अनास्कर, प्रशासक, राज्य सहकारी बँक**

"नागरी सहकारी बँकिंग क्षेत्रातील ७५ टक्के बँका आज चांगला व्यवसाय करीत आहेत. अधूनमधून पुढे येणाऱ्या घोटाळ्याच्या प्रकरणांतून संपूर्ण सहकार क्षेत्राची बदनामी होते. अशा बँकांचे सभासद, सूज्ञ ठेवीदार आणि या बँकांत शेकडो कोटींच्या ठेवी ठेवणाऱ्या सहकारी पतसंस्थांनी तरी त्यांच्या पैशाबद्दल जागरूक राहायला हवे."

**-सतीश मराठे, संचालक, भारतीय रिझर्व्ह बँक**

"अनेकवार पर्यवेक्षण, परीक्षणे, जोखीम व्यवस्थापनाचे निकष असूनही, 'न्यू इंडिया'तील अनियमितता वेळीच रिझर्व्ह बँकेच्या लक्षात कशा आल्या नाहीत? व्यक्तींना कर्ज घ्यायचे तर त्यांना सिबिल गुणांकन असते मग बँकांना ते का नाही? व्यवस्थेतील त्रुटीच याला जबाबदार आहे."

**-देवीदास तुळजापूरकर, महासचिव, महाराष्ट्र स्टेट बँक एम्प्लॉइज फेडरेशन.**

## सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांकरिता दि. २० फेब्रुवारी रोजी डोंबिवली लाईट हाऊस येथे रोजगार मेळाव्याचे आयोजन

**■ठाणे। प्रतिनिधी :**

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, ठाणे व लाईट हाऊस कम्युनिटीज फाऊंडेशन, ठाणे यांच्या संयुक्त विद्माने दि.२० फेब्रुवारी, २०२५ रोजी सकाळी ९.३० वाजता डोंबिवली लाईट हाऊस, महावीर हाईटस, पाणी टाकी जवळ, वीर सावरकर रोड, डोंबिवली (पूर्व), जि.ठाणे येथे सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांकरिता रोजगार मेळावा आयोजित करण्यात येणार आहे. या मेळाव्यात एस.एस.सी, एच.एस.सी, पदवीधर, आय.टी.आय / डिप्लोमा इ. या शैक्षणिक पात्रतेच्या उमेदवारांसाठी नोकरीच्या संधी उपलब्ध आहेत. तरी सर्व नोकरी इच्छुक उमेदवारांनी या मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, ठाणे सहायक आयुक्त संध्या साळुंखे यांनी कळविले आहे.

## "मला मराठी येत नाही, जा माझी तक्रार करा"
## आरपीएफ जवानाची मनसे नेत्यासोबत मुजोरी

**■उल्हासनगर।प्रतिनिधी:**



उल्हासनगरमधून एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. उल्हासनगरमध्ये आरपीएफ जवानाची मुजोरी पाहायला मिळाली आहे. आरपीएफ जवानाने मराठी बोलण्यास नकार दिला, तसेच त्यानं या प्रकरणात मनसेचे जिल्हाध्यक्ष सचिन कदम यांच्याशी हुज्जत घातली. एवढंच नाही तर मराठीला अभिजात भाषेचा दर्जा कधी मिळाला? असा संतापजनक सवाल देखील यावेळी करण्यात आला आहे. घटनेबाबत अधिक माहिती अशी की, "मला मराठी येत नाही, जा माझी तक्रार करा", अशी मुजोरीची भाषा उल्हासनगरमध्ये आरपीएफ जवानाने वापरली आहे. मनसे जिल्हाध्यक्ष सचिन कदम यांच्याशी बोलताना त्याने ही भाषा वापरली. उल्हासनगर रेल्वे स्थानकात बुकिंग वरून सुरू असलेल्या गोंधळाची माहिती घेण्यासाठी मनसे जिल्हाध्यक्ष सचिन कदम हे तिथे गेले असता एका आरपीएफ जवानाने हिंदीत बोलण्यास सुरुवात केली. त्यावरून 'मराठीत बोला' असं सचिन कदम यांनी म्हटलं असता, मला मराठी येत नाही, असं त्याने म्हटलं. त्यावर याबाबत मी डीआरएमकडे तक्रार करतो, असं सचिन कदम यांनी म्हणताच झ जा माझी तक्रार करा, अशी मुजोरीची भाषा या आरपीएफ जवानाने वापरली. तर त्यानंतर तिथे मध्यस्थी करण्यासाठी आलेल्या एका आरपीएफच्या मराठी अधिकाऱ्यानेही 'त्याला मराठी येत नाही, पण तुम्हाला सुद्धा हिंदी येत नाही का? तुम्ही हिंदीत बोला', असा सल्ला मनसे पदाधिकाऱ्यांना दिला. त्यावर मुख्यमंत्र्यांनी मराठी भाषा वापरण्याबाबतचा जीआर काढला असून मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे, असं मनसे नेते सचिन कदम यांनी त्यांना सांगितलं. त्यावर 'मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा कधी मिळाला?' असा संतापजनक सवाल या मराठी आरपीएफ अधिकाऱ्याने केला. या सगळ्या प्रकाराचा व्हिडिओ समोर आला असून याप्रकरणी आरपीएफच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गंभीर दखल घेऊन महाराष्ट्रात काम करणाऱ्या परप्रांतीय आरपीएफ जवानांना मराठी भाषेचे धडे द्यावेत, अशी मागणी होऊ लागली आहे.

## पुण्यातील सर्व वाहनधारकांसाठी महत्वाची बातमी
## हाय सिक्युरिटी नंबर प्लेटबाबत महत्वाचा निर्णय

**■पुणे। प्रतिनिधी :**




एचएसआरटी नंबर प्लेट अधिकृत वेंडरकडून बसवून घ्यावी. कोणी एचएसआरपीसारखी दिसणारी नंबर प्लेट बसवली तर त्याची नोंद वाहन प्रणालीत होणार नाही. त्यामुळे वाहन प्रणालीत तुमची एचएसआरटी नंबर प्लेट पेंडींग दिसेल.

राज्यातील सर्व वाहनांना हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट बसवण्याची सक्ती करण्यात आली आहे. १ एप्रिल २०१९ च्या पूर्वीच्या सर्व प्रकारच्या वाहनांना ही नंबर प्लेट बसवावी लागणार आहे. एचएसआरटी नंबर प्लेट शिवाय वाहन आढळले तर मोटर वाहन कायद्यानुसार कारवाई आणि दंड करण्यात येणार आहे. त्यासाठी राज्य परिवहन विभागाने ३१ मार्चपर्यंत मुदत दिली होती. परंतु आता पुणेकरांना दिलासा दिला आहे. मुदत वाढवली आहे. आता ३० एप्रिल २०२५ पूर्वी हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट बसवावी लागणार आहे.

**यामुळे पुण्यात वाढवली मुदत**

पुणे जिल्ह्यात वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. यामुळे आता ३० एप्रिल २०२५ पूर्वी एचएसआरपी बसवून घ्यावी, असे आवाहन परिवहन विभागाने केले आहे. पुण्यातील वाहन संख्या पाहिल्यावर २५ लाखांपेक्षा जास्त वाहनांना ही नंबरप्लेट बसवावी लागणार आहे. त्यासाठी एका कंपनीला काम देण्यात आले आहे. या कंपनीने ही नंबरप्लेट बसवण्यास सुरुवात केली आहे. परंतु आतापर्यत केवळ पंधरा हजार जणांनी नंबर प्लेटसाठी अर्ज केले आहे. त्यातील सात ते आठ हजार वाहनांना ही नंबरप्लेट बसवण्यात आली आहे.

**एचएसआरटी नंबर प्लेटची किंमत काय?**

मोटर सायकल आणि ट्रॅक्टरसाठी 450 रुपये + जीएसटी

थ्री व्हीलरसाठी 500 रुपये + जीएसटी

फोर व्हीलर आणि इतर वाहनांसाठी 745 रुपये + जीएसटी

**एचएसआरटी नंबर प्लेट कशी मिळेल?**

transport.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरून ऑनलाईन पद्धतीने एचएसआरटी नंबर प्लेटसाठी नोंदणी करावी लागणार आहे. त्यानंतर फिटमेंट सेंटरची लिस्ट सिलेक्ट करुन तुमचे नजीकचे सेंटर निवडावे लागेल. त्यानंतर तुम्हाला तारीख मिळेल. त्या तारखेला फिटमेंट सेंटरला जा. तिथे गेल्यावर वेंडर तुमच्या वाहनाला नंबर प्लेट बसवून देईल. नंबर प्लेट बसवून त्याची नोंद वेंडर वाहन प्रणालीत करणार आहे.

## तुम्ही जेवणात कोणतं तेल वापरताय?
## नागपूरमध्ये सर्वसामान्यांच्या जिवाशी खेळ

**तुमच्या जेवणात भेसळयुक्त तेल?**

- भेसळयुक्त तेल खुल्या डब्ब्यात भरलं जायचं
- डब्ब्यावर ब्रँडेड तेलाचं स्टिकर लावून विक्री
- हुडकेश्वर पोलीस स्टेशन हद्दीतील समतानगरमध्ये कारखाना
- निकृष्ट दजार्चं किंवा वापरलेलं तेल विकलं जात असल्याचा संशय
- निलेश साहू नावाच्या आरोपीला अटक
- 8 लाख 56 हजारांचा मुद्देमाल जप्त

**■नागपूर। प्रतिनिधी :**



आता बातमी आहे तुम्हाला सावध करणारी. जेवणात आपण कोणतं तेल वापरतो त्यावर आपलं आरोग्य अवलंबून असतं. त्यासाठी चांगल्यात चांगला तेल वापरण्याकडे आपला कल असतो. मात्र तुम्ही नामांकित कंपनीचं म्हणून घेतलेलं ते खरंच त्या कंपनीचं आहे का? असं आम्ही का म्हणतोय असा प्रश्न तुम्हाला पडेल. याचं कारण म्हणजे. नागपूरमध्ये भेसळयुक्त तेल विक्रीचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. नामांकित कंपनीच्या डब्ब्यांमध्ये भेसळयुक्त तेल विक्रीचा काळा धंदा नागपूर पोलिसांनी उघड केला आहे.

नागपूरमध्ये ब्रँडेड तेलाच्या नावाखाली भेसळयुक्त तेल विकलं जात असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. आरोग्य चांगलं राहावं म्हणून आपण अन्नपदार्थांमध्ये उत्तम दजार्चं तेल वापरतो. मात्र या अशा प्रकारांमुळे सर्वसामान्यांचं आरोग्य धोक्यात आलं आहे. नागपूरमधील कारखान्यावर छापा टाकत क्राईम ब्रांच आणि हुडकेश्वर पोलिसांनी भेसळयुक्त तेलविक्रीचा प्रकार उघडकीय आणला आहे.

नागपूर शहरात गेल्या काही दिवसांपासून हा भेसळयुक्त तेल विक्रीचा प्रकार सुरू होता. त्यामुळे नागपूरकरच चांगलेच धास्तावलेत. कधीपासून विक्री केली जातेय?, हे तेल कुठून आणलं जायचं याची पोलिसांकडून माहिती घेतली जातेय.काही पैसे कमवण्यासाठी सर्वसामान्यांच्या जीवाशी अशाप्रकारे खेळ केला जातोय. त्यामुळे या आरोपींवर कडक कारवाई करावी अशी मागणी केली जात आहे.



संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# महाराष्ट्रासमोर अमली आव्हान!

ठाणे अमली पदार्थविरोधी शाखेने अमली पदार्थांच्या तस्करी आणि निर्मितीचा छडा लावण्याचे काम सुरू केले आहे. ठाण्यात पोलिसांनी २ कोटी २५ लाखांपेक्षा जास्त किमतीचे मॅफेड्रॉन आणि गांजा असा अमली पदार्थ नुकत्याच केलेल्या कारवाईत जप्त केला. ठाणे आणि मुंबई तसेच पुण्यासह महाराष्ट्राच्या विविध भागात अमली पदार्थ पोहचवले जात होते. त्यासाठी ड्रग्ज माफियांचे जाळे उद्ध्वस्त करण्याचे काम व्हायला हवे. मुंबई, ठाणे आणि रायगड तसेच पालघर परिसरात अमली पदार्थांची केंद्र होऊ पाहत आहेत का, असा प्रश्न निर्माण होत आहे. ठाणे आणि पालघर तसेच रायगड हे जिल्हे महाराष्ट्राच्या प्रमुख शहरात जाण्यासाठी समुद्रकिनारा, रस्ते, रेल्वे वाहतुकीसाठी महत्त्वाचे आहेत. येथून महाराष्ट्राच्या कोणत्याही कानाकोर्पयात जाता येणे शक्य आहे. त्यामुळे परराज्यात बनवलेले अमली पदार्थ तस्करीच्या मार्गाने महाराष्ट्रात आणले जात असल्याचे पोलिसांच्या अलीकडच्या कारवाईत स्पष्ट झाले आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी जिल्ह्याची ओळख मुख्यमंत्र्यांचे ठाणे अशी होती. आज ती उपमुख्यमंत्र्यांचे ठाणे अशी जरी असली तरी महाराष्ट्रातील महत्त्वाचे असे सत्ताकेंद्र या जिल्ह्यात आहे. येत्या काळात स्मार्ट सिटी, मेट्रो असे महत्त्वाचे प्रकल्प या जिल्ह्यात होतील. त्यामुळे ठाण्याचा चेहरामोहरा बदलणार आहे. सांस्कृतिक आणि राजकीय ओळख असलेल्या ठाणे जिल्ह्याची ओळख अमली पदार्थांमुळे बिघडत असल्याने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी याबाबत विशेष लक्ष देण्याची गरज आहे. ठाण्यातील अलीकडच्या काळात एमडी, इतर अमली पदार्थ, बेकायदा विक्री होणारे कफ सिरप, गांजा, गुटखा आणि दारुचे अड्डे उद्ध्वस्त करण्यासाठी कारवाईला वेग देण्याची गरज आहे. मुंबईनंतर ठाण्यात नागरीकरण झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे ठाणे शहर आणि जिल्हा तसेच ग्रामीण भागातही शाळा, महाविद्यालयात शिकर्णाया तरुणांची संख्याही वाढत आहे. रायगडमधील कर्जत, वांगणी हा भाग अभियांत्रिकी महाविद्यालयांमुळे शैक्षणिक केंद्र म्हणून आकाराला येत आहे. अशा परिस्थितीत येथील तरुणाईची काळजी घेण्याची गरज आहे. महाराष्ट्राच्या बाहेर या अमली पदार्थांच्या प्रयोगशाळा उद्ध्वस्त करण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारने वेळीच पावले उचलावीत. यासाठी भिवंडीचे खासदार सुरेश म्हात्रे यांनी नुकतीच केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली. त्यांच्या या प्रयत्नांना इतर ठाणे आणि लगतच्या जिल्ह्यातील सर्वच लोकप्रतिनिधींनी पाठिंबा देऊन अमली पदार्थविरोधी मोहिमेत सहभाग घ्यायला हवा. पालघर जिल्हा समुद्रकिनारा आणि गुजरात राज्याच्या लगतच असल्याने या जिल्ह्यावर मोहिमेदरम्यान विशेष लक्ष द्यायला हवे. दमण भागातून होणारी मद्याची आणि गुजरात राज्यातील अमली पदार्थविरोधी कारवायांनी महाराष्ट्रातील अमली पदार्थविरोधी तपास यंत्रणांनी सतर्कता बाळगायला हवी. अमली पदार्थांची तस्करी आणि विक्रीचे मोठे आंतरराष्ट्रीय रॅकेट सक्रिय असल्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली होती. कोट्यवधींचे अमली पदार्थ सापडत असताना आणि यात होर्णाया कारवाईतील सातत्यामुळे हा भीतीदायक संशय खरा असल्याचे स्पष्ट व्हावे. ठाणे आणि परिसरातील अमली पदार्थविरोधी कारवाया पाहता मुंबई आणि ठाणे परिसरातील हा धोका राज्य सरकार, लोकप्रतिनिधी आणि नागरिकांनी वेळीच ओळखायला हवा. मुंबई तसेच ठाणे, पुणे आणि राज्यातील इतर महानगरातील आर्थिक सुबत्ता पाहून ड्रग्ज माफियांनी या शहरांतील तरुणांना लक्ष्य केले आहे. अमली पदार्थांच्या व्यवहारातून निर्माण होणारी गुन्हेगारी ही वेगळी चिंता आहे. अमली पदार्थ निर्मितीचे केंद्र जरी राज्याबाहेर असले तरी त्याच्या विक्रीचे जाळे महाराष्ट्रात पसरत आहे. हे जाळे उद्ध्वस्त करण्यासाठी अगदी तरुणाईच्या कौटुंबिक स्तरापासून प्रयत्न व्हायला हवेत. तरुणांना अमली पदार्थ सेवनाचे दुष्परिणाम समजावण्यासह अमली पदार्थविरोधी मोहिमेत तरुणाईचा सक्रिय सहभाग वाढवण्यासाठी सरकारी, संस्थात्मक पातळीवर योजना, मोहीम आणि उपक्रम राबवणे गरजेचे झाले आहे. या अमली पदार्थांच्या तस्करीचा धोका संसदेत चर्चिला गेला आहे. मागील वर्षी ऑगस्ट महिन्यात गुजरातच्या दहशतवादविरोधी पथकाने भिवंडीत कारवाई करून ८०० कोटींचा ७९२ किलोचा लिक्विड एमडी ड्रग्जचा साठा जप्त केला. मात्र या कारवाईतील सूत्रधार अद्याप समोर आलेला नाही. खासदार सुरेश म्हात्रे यांनी केंद्रीय गृहमंत्र्यांना दिलेल्या निवेदनात ड्रग्ज प्रकरणातील धोक्याचे गांभीर्य समजून घ्यायला हवे. यातील आरोपी कारवाई झाल्यानंतरही जामीन किंवा कायद्यातील पळवाटांमधून सुटल्यानंतर चोरी, धमकी, खंडणी, जमिनी बळकावणे अशा गंभीर गुन्ह्यात आढळत आहेत. या गुंडांमागे असलेल्या राजकीय शक्तींबाबत खासदार म्हात्रे यांनी व्यक्त केलेली चिंता राज्यातील राजकारणाला आरोपीच्या पिंजर्यात उभे करत आहे. या राजकीय पाठिंब्यामुळे पोलिसांना कारवाई करताना अडचणी येत असल्याचे खासदार म्हात्रे यांनी स्पष्ट केले. ठाण्यातील डायघर, भिवंडी, कल्याण, दिवा, डोंबिवली तसेच कल्याण परिसरात अमली पदार्थविक्रीचे जाळे फैलावले आहे. हा धोका पाहता अमली पदार्थांचे हे जाळे नष्ट करण्यासाठी पोलीस, तरुण-तरुणी, त्यांचे पालक, लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्था आणि सरकारी यंत्रणांनी एकत्र प्रयत्न करणे ही गरज बनली आहे.

# धनंजय मुंडे-सुरेश धस यांच्या भेटीचा अन्वयार्थ!

**मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर एकापेक्षा एक घणाघाती आणि गंभीर आरोप करणारे भाजपचे आमदार सुरेश धस यांनी थेट धनंजय मुंडे यांची भेट घेतल्यामुळे अनेकांना प्रचंड धक्का बसला. तेही भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार हे या भेटीला फारसे महत्त्व देत नसल्याचे दाखवत असले तरी धनंजय मुंडे आणि सुरेश धस यांच्या भेटीमध्ये बराच अन्वयार्थ दडलेला आहे, हे न समजण्याइतकी जनता काही अजाण नाही.**



मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची झालेली अमानुष हत्या हे हिमनगाचे एक टोक असून एकूणच बीड जिल्ह्यामध्ये काय भयानक स्थिती झालेली आहे, याची जाहीरपणे बिनधास्त पोलखोल कर्णायाचा धडाका भाजपचे आमदार सुरेश धड यांनी लावला होता. त्यामुळे त्यांनी ज्यांना लक्ष्य केले होते, ते राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांच्याविषयी महायुती सरकारकडून काही तरी ठोस निर्णय घेतला जाईल, असे वाटत होते. पण चक्क सुरेश धस हेच धनंजय मुंडे यांच्या भेटीला गेले. त्यामुळे लोकांचा मोठा अपेक्षाभंग झाला. त्यात पुन्हा धस यांना प्रसारमाध्यमांनी या विषयी विचारले तेव्हा त्यांनी जे उत्तर दिले ते काही पटण्यासारखेही नव्हते.

धस म्हणाले की, धनंजय मुंडे यांच्या डोळ्याचे ऑपरेशन झाले होते, त्यामुळे त्यांच्या तब्येतीची विचारपूस करण्यासाठी मी गेलो होतो. एखाद्या व्यक्तीचा फार मोठा अपघात झाला असेल किंवा आजार झाला असेल आणि त्याच्या जीवाला प्रचंड मोठा धोका निर्माण झाला असेल तेव्हा माणुसकीच्या दृष्टिकोनात त्या स्थितीत एखाद्याची विचारपूस करणे समर्थनीय ठरू शकते, पण इथे धनंजय मुंडे यांच्या डोळ्याचे सर्वसाधारण ऑपरेशन झालेले आहे, ते चांगले हिंडत फिरत आहेत. शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त आहेत. अशा स्थितीत सुरेश धस हे मुंडे यांना जाऊन भेटले.

भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी याविषयी प्रसारमाध्यमांना माहिती दिली. त्यावेळी ही भेट जगजाहीर झाली आणि अनेकांना धक्का बसला. त्यात पुन्हा ही भेट साडेचार तास झाली असे बावनकुळे म्हणाले, आता डोळ्याचे ऑपरेशन झालेल्या धनंजय मुंडे यांची धस साडेचार तास अशी काय विचारपूस करत होते, असा प्रश्न अनेकांना पडला आहे. बावनकुळे हे भाजपचे प्रदेशाध्यक्ष आहेत, त्यामुळे ते आपल्याच पक्षांच्या झुंजार आमदाराची कशासाठी बदनामी करतील, असाही प्रश्न पडतो. धनंजय मुंडे यांच्या पक्षाचे प्रमुख अजित पवार यांनी आपली भूमिका स्पष्ट करताना सांगितले की, जोपर्यंत धनंजय मुंडे यांच्यावर आरोप सिद्ध होत नाही, तोपर्यंत त्यांचा राजीनामा घेतला जाणार नाही.

दुसऱ्या बाजूला धनंजय मुंडे आणि सध्या तुरुंगात असलेले वाल्मिक कराड यांच्याविषयी एकाहून एक प्रकरणे बाहेर येत आहेत. त्यात सुरेश धस हे घोटाळे समोर आणण्यामध्ये आघाडीवर आहेत. अशा स्थितीत अजित पवार हे जरी राजकीय कारणामुळे धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेत नसले तरी आता मुख्यमंत्री असलेल्या देवेंद्र फडणवीस यांच्या प्रतिमेला धक्का बसू लागला आहे. तुमच्याच पक्षाचे आमदार तुमच्याच सरकारमधील मंत्र्यांवर एकापाठोपाठ गंभीर आरोप करत आहेत आणि तुम्ही काहीच कारवाई करत नाही, असा प्रश्न फडणवीस यांच्याविषयी उपस्थित होत आहे. त्यामुळे या कोंडीतून भाजपला मार्ग काढणे गरजेचे बनले आहे. सध्या तुरुंगात असलेले वाल्मिक कराड आणि त्याच्या हस्तकांवर विविध प्रकारचे आरोप होत आहेत. त्यांची चौकशी सुरू आहे. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनीही संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा विषय लावून धरलेला आहे. अजित पवार यांना भेटून त्यांना घोटाळ्यांची कागदपत्रे दिली आहेत.

भाजपसाठी खरे तर धनंजय मुंडे आणि पंकजा मुंडे हे दोघेही अवघड जागेचे दुखणे आहे. कारण गोपीनाथ मुंडे हे महाराष्ट्रातील भाजपचे एक प्रमुख नेते होते. त्यांची पुढची पिढी म्हणजे धनंजय मुंडे आणि पंकजा मुंडे हे आहेत. गोपीनाथ मुंडे हयात असतानाच धनंजय मुंडे हे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सामील झाले. गोपीनाथ मुंडे यांचे निधन झाल्यानंतर पंकजा मुंडे या त्यांच्या उत्तराधिकारी म्हणून पुढे आल्या, पण आपणच जनतेच्या मनातील मुख्यमंत्री आहोत, असे जाहीरपणे सांगून २०१४ नंतर मुख्यमंत्री असलेल्या देवेंद्र फडणवीस यांना आव्हान देऊ लागल्या.

पंकजा मुंडे यांची एकूणच भूमिका ही फडणवीस यांना आव्हान देणारी राहिलेली आहे. त्यात पुन्हा धनंजय मुंडे यांनी राष्ट्रवादीमध्ये गेल्यावर बीडमध्ये आपली बाजू मजबूत करण्यासाठी भाजपसाठी आव्हान उभे केले. त्यामुळे धनंजय मुंडे यांना आवर घालण्यासाठी भाजपला काही तरी उपाययोजना करणे आवश्यक होते. कारण बीडमध्ये राखेतून जे माफिया निर्माण झालेले आहेत, ते काही एका दिवसात निर्माण झालेले नाही. वाल्मिक कराडच्या इशाऱ्यानुसार त्याच्या हस्तकांनी संतोष देशमुख यांची निर्घृणपणे हत्या केली असे आरोप होत आहेत. त्याची चौकशी सुरू आहे. सुरेश धस यांनी जेव्हा आकाचा आका असे म्हणत धनंजय मुंडे यांना टार्गेट करायला सुरुवात केली, तेव्हा भाजपने त्यांना मोकळीक दिल्याचे दिसत होते. पण अजित पवार यांनी धनंजय मुंडे यांची पाठराखण करण्याची भूमिका घेतली. त्यामुळे भाजपचे काही चालेनासे झाले.

सुरेश धस एका बाजूला राज्यात धनंजय मुंडे यांच्या विरोधातील विविध आंदोलनांना उपस्थिती लावून मुंडे यांच्यावर गंभीर आरोप करत आहेत. त्यामुळे भाजपसमोर मोठा पेच निर्माण झाला आहे. कारण राज्यभर धनंजय मुंडे यांच्या विरोधात इतका गदारोळ सुरूअसताना राज्य सरकार काहीच हालचाल करत नाही, असे चित्र उभे राहिले आहे. दुसऱ्या बाजूला उपमुख्यमंत्रीपद असलेले एकनाथ शिंदे हे फारसे फडणवीस यांच्यासोबत दिसत नाहीत. ते एकाच सरकारमध्ये असले तरी मागच्या कार्यकाळात जशी त्यांची सलगी होती, तशी आता दिसेनाशी झालेली आहे. एकनाथ शिंदे आपली नाराजी वेगवेगळ्या निमित्ताने व्यक्त करताना दिसत आहेत.

आता तर शिवसेनेच्या मंत्र्यांकडे जी खाती आहेत, त्यांच्या कामांवर लक्ष ठेवण्यासाठी स्वतंत्र कक्ष स्थापन केल्याचे ऐकिवात आहे. त्यामुळे सरकारमध्ये राहून एकनाथ शिंदे हे सवतासुभा निर्माण करत आहेत, असे दिसत आहेत. त्यामुळे पूर्वी फडणवीस त्यांना प्रत्येक वेळी एकनाथराव शिंदे असे संबोधताना दिसत, तसे आता दिसत नाहीत. शिंदेंची सरकारमध्ये राहूनही स्वतंत्रवृत्ती पाहिल्यावर भाजपला अजित पवार यांना नाराज करून जमणार नाही. त्यामुळे धनंजय मुंडे यांच्यावर इतके गंभीर आरोप होत असतानाही देवेंद्र फडणवीस त्यांच्यावर काही कारवाई करताना दिसत नाहीत. इतकेच नव्हे तर एक आमदार एका मंत्र्याला जाऊन भेटला तर त्यात काही गैर नाही, अशी प्रतिक्रिया धनंजय मुंडे आणि सुरेश धस यांच्या भेटीवर फडणवीस यांनी दिली. खरे तर ही प्रतिक्रिया फडणवीस यांच्यासारख्या कर्तव्यनिष्ठ व्यक्तीला शोभणारी नाही, पण त्यांचाही नाईलाज असावा.

एका बाजूला एकनाथ शिंदे यांची वाढती नाराजी आणि दुसऱ्या बाजूला धनंजय मुंडे यांच्यावरील धस यांच्या आरोपांमुळे सरकारची प्रतिमा मलीन होत आहे. अशा वेळी भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंदशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत मुंडे-धस यांची साडेचार तास चर्चा होते, ती बातमी स्वतः बावनकुळे प्रसारमाध्यमांना देतात, त्यात बरेच काही दडलेले आहे असे दिसते. कारण धस यांची जर धनंजय मुंडे यांच्याशी भेट घडवून आणली तर धस यांची जनमनातील प्रतिमा आपोआप मलीन होणार आहे. त्यांना मिळत असलेला पाठिंबा कमी होणार आहे, त्यांच्या हेतूवर शंका घेतली जाणार आहे, यांची कल्पना बावनकुळेंना असावी.

धस यांची हवा काढली तर धनंजय मुंडे यांच्यावरील आरोपांचा जो गदारोळ सुरू आहे, तो बराच कमी होईल, याचीही भाजपच्या नेत्यांना कल्पना असावी. आपण धनंजय मुंडे यांची भेट घेतल्यावर आपली प्रतिमा मलिन होणार, इतके न कळण्याइतके धस काही दूधखुळे नाहीत, पण पक्षाच्या आदेशापुढे त्यांनाही काही करता येऊ शकत नसावे. धनंजय मुंडे प्रकरण फार तापवणे भाजपच्यादेखील हिताचे नाही, हाच बावनकुळेंच्या उपस्थितीत धनंजय मुंडे आणि सुरेश धस यांच्यात झालेल्या भेटीचा अन्वयार्थ असावा.

# पंचायत राज वाचविण्याचे आव्हान

**पंचायत राज ही भारतीय लोकशाहीची मूलभूत रचना असून, ७३व्या आणि ७४व्या घटनादुरुस्तीमुळे स्थानिक स्वराज्य संस्थांना बळकटी मिळाली. या सुधारणा लोकशाहीसाठी महत्त्वाच्या ठरल्या असून, ग्रामसभांना अधिक अधिकार प्राप्त झाले; मात्र, गेल्या काही वर्षांत पंचायत राज संस्थांच्या अस्तित्वावर संकट निर्माण झाले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांवर प्रशासकांची नियुक्ती, प्रशिक्षण अनुदान कपात आणि ग्रामसभांचे महत्त्व कमी करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. परिणामी, स्वायत्तता धोक्यात आली आहे.**



ग्रामपंचायत ही संस्था लोकशाहीचा पाया आहे. ७३ आणि ७४व्या घटना दुरुस्तीमुळे ग्रामसभांना अनन्यसाधारण महत्त्व आले आहे. तसेच महिला आणि मागासवर्गीय, ओबीसी यांना ग्रामपंचायत पातळीवर आरक्षण मिळाले. त्यामुळे वंचित घटकांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सुरुवातीला ३० टक्के जागांवर महाराष्ट्रात, तर आत्ता ५० टक्के आरक्षण मिळाले. ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये मिळालेल्या भागीदारीमुळे या समूहाचा सार्वजनिक जीवनात काम करण्याचा आणि वावरण्याचा आत्मविश्वास वाढला. राज्य सत्ता आंदोलनसारख्या स्वयंसेवी संस्था, संघटनांच्या प्रशिक्षणामुळे प्रामुख्याने नव्याने ग्रामपंचायत स्तरावर निवडून येऊन काम करू पाहणाऱ्या स्त्रिया नेतृत्व म्हणून सक्षम होऊ लागल्या. पंचायत राज प्रशिक्षण केंद्रे तसेच राज्यस्तरावरील, राष्ट्रीय स्तरावरील प्रशिक्षण केंद्रांमध्ये प्राप्त झालेल्या अनुदानामुळे आणि वेळोवेळी काढलेल्या विविध शासकीय अध्यादेशामुळे ग्रामपंचायतीसह स्थानिक स्वराज्य संस्था विकासाच्या प्रक्रियेमध्ये विशेष योगदान देऊ लागल्या. राजकीय पक्ष तळागाळातील ग्रामपंचायत निवडणुकीमध्ये सक्रिय राहू लागले. चूक की बरोबर याची चर्चा होऊ शकते. परंतु निश्चितपणे मुलभूत सुविधा उभ्या करण्यात गेल्या ३० वर्षांमध्ये नक्कीच सकारात्मक बदल झालेला आहे.

स्मशानभूमी, शौचालय, रस्ते, ग्रामपंचायत इमारती, शाळा, ग्राम न्यायालय, अंगणवाडीच्या इमारती अशा मुलभूत सुविधा नक्कीच ग्रामीण भागात चांगल्या प्रकारे उभ्या राहिल्या. सुरुवातीला आरक्षण मिळाल्यावर पारंपारिक, उच्चवर्गीय सत्ताधाऱ्यांच्या मर्जीत राहून महिलांनी आणि वंचित जनजातीतील निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना मग ते ग्रामपंचायत सदस्य असो, पंचायत सदस्य असो, जिल्हा परिषद सदस्य असो त्यांनी कामे केली, मान दिला. पण हळूहळू सत्तास्थानांचे महत्त्व आणि जाणिवेतून स्वतंत्र नेतृत्व, स्वतंत्रपणे भूमिका घेऊ लागले. अलीकडेच बीडमध्ये संतोष देशमुख या सरपंचांची झालेली हत्या ही घटना म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये सक्षम होत असलेल्या नेतृत्वाने पारंपारिक सत्ताधाऱ्यांना जे आव्हान दिले त्याचा कहर आहे.

या संदर्भातील पती-सरपंचांनी झेंडा फडकविण्यापासून ते नगराध्यक्षांना रजेवर पाठविण्यापर्यंतच्या अनेक घटना आणि अनुभव या लोकप्रतिनिधींच्या गाठीशी आहेत. स्थानिक न्यायालय आणि उच्च न्यायालयापर्यंत अशा सक्षम, स्वतंत्र नेतृत्वाला अडचणीत आणण्यासाठी अविश्वासाचा ठराव आणणे, अपात्र ठरविणे, भ्रष्टाचाराच्या खोट्या प्रकरणात गुंतविणे अशी प्रकरणे न्यायालयात आली आहेत. इथल्या स्थानिक स्वराज्य संस्थांमधील लोकशाही आणि विकासाच्या प्रक्रियेतील भागीदारी महिला, मागास जनजातींची, आदिवासी, ओबीसी यांची वाढीस लागली आहे. यामुळेच जातीअंध, धर्मांध राजकारण करून कार्पोरेटना इथली नैसर्गिक साधन संपत्ती आणि लोक यांच्यावर मालकी निर्माण करण्याच्या हेतूने सुरू असलेले राजकारण, स्थानिक स्वराज्य संस्थेत सक्रिय झालेले नेतृत्व त्यांची अडचणीची ठरत आहे. आपण समाजमाध्यमांवर फक्त राज्यस्तरावर आणि केंद्रस्तरावर पक्ष्यांची फोडाफोडी, निवडणुकीतील गैरप्रकार याची चर्चा करण्यात गुंतले असताना इकडे लोकशाहीचा मूलभूत ढाच्या असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था नियोजनबद्ध पद्धतीने संपविण्यात येत आहेत. ग्रामपंचायतीला सुरुवातीला सरपंचांची थेट निवडणूक घेण्यात आली. त्यामुळे देशात निर्माण होऊ पाहणाऱ्या हुकूमशाहीला पाठिंबा देण्यासाठी ग्रामीण स्तरावरच मानसिकता बनवायला सुरुवात झाली. ग्रामपंचायत, नगरपालिका, महापालिकांच्या निवडणुका हळूहळू देशपातळीवर लांबणीवर टाकण्यात आल्या. या सर्व संस्थांवर प्रशासक नेमण्यात आले. प्रशासकामार्फत स्थानिक जमिनी, पाणी, रस्ते इत्यादी सामग्री कार्पोरेटना सहजपणे मिळण्याची व्यवस्था करण्यात आली. पंचायत राजचे प्रशिक्षण करणाऱ्या राष्ट्रीय स्तरावरील आणि स्वयंसेवी संस्थांमार्फत होणाऱ्या प्रशिक्षणाच्या कार्यक्रमाचे अनुदान सुरुवातीला कमी केले गेले आणि आता तर हळूहळू बंद करण्यात येत आहे. त्या ठिकाणी नवीन नोकर भरती बंद केली आहे. करारावर कन्सल्टंट नेमण्यात येत आहेत. आपल्या राजकीय महत्त्वाकांक्षेला मदत करू शकणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना तात्पुरत्या नेमणुकीचे अधिकार दिले जात आहेत. या नियोजन पद्धतीने पंचायत राज मंत्रालय स्तरापासून ते ग्रामपंचायत स्तरापर्यंत होणाऱ्या खच्चीकरणामुळे पंचायत राज व्यवस्था मोडकळीला आली आहे. एक मे, दोन ऑक्टोबर, १५ ऑगस्ट, २६ जानेवारी आणि हिशेब मांडण्याच्या एप्रिलमधील महत्त्वाच्या ग्रामसभा, महिला ग्रामसभा, विशेष महिला ग्रामसभा या तारखांना घेणे ७३ आणि ७४व्या घटनादुरुस्तीने कायद्यात बंधनकारक करण्यात आले होते, ते आता अध्यादेश काढून ऐच्छिक करण्यात आले आहे. यावर कोणाही राज्यस्तरावरील, राष्ट्रीय स्तरावरील निवडून आलेल्या आमदार, खासदारांनी हरकत घेतली नाही. लोकशाहीवर होणाऱ्या दूरगामी परिणामांची चिंता ना कोणा राजकीय पक्षाला आहे ना निवडून आलेल्या आमदार- खासदारांना. त्यामुळे स्थानिक पातळीवरच्या कटकटी कमी झाल्या असे त्यांना वाटते. महाराष्ट्रात ७०हून अधिक दारूची दुकाने, परमिट रूम बियर बार महिला मतदानातून बॅलेट पेपरवर निवडणुका घेऊन कायमस्वरूपी बंद ठेवण्याचा अनुभव स्थानिक स्वराज्य संस्थांच्या ताकदीची जाणीव देणार आहे. या मतदान पद्धतीला उच्च न्यायालयात आणि सर्वोच्च न्यायालयात आव्हान देणारी याचिका दारू धंदेवाल्याने दाखल केल्या. त्याचा निकाल दारू दुकानदारांच्या विरोधात आणि महिलांच्या मतदान आणि महिला ग्रामसभांचे लोकशाहीमधील अनन्यसाधारण महत्त्व अधोरेखित करणारे ठरले. पंचायत राजचा महत्त्वपूर्ण निकाल म्हणून महाराष्ट्र लॉ जर्नलमध्ये नोंदविण्यात आला. या निकालामुळे ग्रामसभेमध्ये झालेल्या घटनात्मक चौकटीतील कोणताही निर्णय सर्वोच्च न्यायालय किंवा संसद यांना बदलता येणार नाही, हे स्पष्ट झाले आहे. म्हणूनच कार्पोरेटमधील आपल्या मित्रांना देशातील नैसर्गिक साधनसामग्रीची मालकी देऊ पाहणाऱ्यांना पंचायत राज आणि स्थानिक स्वराज्य संस्था संपविणे महत्त्वाचे वाटते आहे. त्यातूनच होणाऱ्या हिंसेच्या घटनेने आता जातीय, राजकीय वळण घेतलेले पहायला मिळते आहे, याविषयी जाणीव जागृती करण्यासाठी निघालेल्या पदयात्रा राजधानीपर्यंत पोहोचू दिल्या जात नाहीत, मोडून काढल्या जातात. लोकचळवळीची, जनचळवळीची यांना भीती वाटते, हे यातून स्पष्ट होते. केवळ समाजमाध्यमांवर सक्रिय होणे पुरेसे नाही. प्रत्यक्ष भारत जोडोसारख्या, सरपंच परिषदसारख्या जन चढवली उभ्या करून लोकशाहीचा पाया असणारे पंचायत राज वाचविण्याचे मोठे आव्हान आहे.

कामगार नेते जार्ज फर्नांडिस यांच्या पुढाकाराने ५७ वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या मुंबईस्थित न्यू इंडिया सहकारी बँकेवर रिझर्व्ह बँकेने लादलेले निर्बंध हजारो गुंतवणूकदार व ग्राहकांच्या काळजाचा ठोका चुकवणारे आहेत. तब्बल ३५ वर्षांपूर्वी शेड्यूल्ड बँकेचा दर्जा मिळालेल्या या बँकेची आर्थिक स्थिती गेल्या तीन वर्षांपासून सातत्याने ढासळत होती. त्यातून मार्ग निघत नसल्याचे लक्षात आल्यावर ही कठोर कारवाई करण्यात आली. मात्र प्रामुख्याने सहकारी बँकांची अशी अवस्था का होते? त्याला जबाबदार कोण? व्यवस्थापन मंडळ की यावर देखरेख ठेवणाऱ्या सरकारी यंत्रणा? यासारखे अनेक प्रश्न पुन्हा एकदा उभे ठाकले आहेत. सहकार कायद्यांन्वये स्थापन झालेल्या बँका रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार कार्यरत असतात. त्यांच्या वित्तीय व्यवहाराचे वेळोवेळी परीक्षण व अंकेक्षण होत असते. तरीही त्या डबघाईला येत असतील तर यंत्रणेतला भुसभुशीतपणा समोर येतो. अलीकडे ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी बँकांमधील स्पर्धा कमालीची वाढली आहे. ठेवीवर अधिक व्याजदर व कर्जावर कमी अशा योजना बँकांकडून सर्रास राबवल्या जातात. अनेकदा त्या रिझर्व्ह बँकेने घालून दिलेल्या मर्यादांचे उल्लंघन करणाऱ्या असतात. अशा योजनांना वेळीच चाप लावण्याचे काम ही मध्यवर्ती बँक खरोखर करते का? करत असेल तर मग परिस्थिती आटोक्याबाहेर जाण्याची वेळ येतेच कशी? प्रत्येक बँकेची वित्तीय स्थिती बघण्यासाठी दर सहा महिन्यांनी होणाऱ्या बैठकांमध्ये नेमके काय घडते? यात रिझर्व्ह बँकेकडून दिल्या जाणाऱ्या निर्देशांचे पालन या बँका करत नसतील तर वेळीच

# 'न्यू इंडिया'ही बुडाली...



कारवाई का केली जात नाही असे अनेक प्रश्न यातून उभे ठाकले आहेत. प्रकरण अगदी गळ्याशी आले की अशी धडक कारवाई करून मोकळे व्हायचे असेच धोरण जर नियामक संस्थांकडून राबवले जात असेल तर गुंतवणूकदारांच्या विश्वासाला जो तडा जातो व नंतर दीर्घकाळ त्यांना हेलपाटे घालावे लागतात त्याचे काय? 'न्यू इंडिया'त अडीच हजार कोटींच्या ठेवी होत्या त्या परत मिळण्याचा मार्ग पुढचे किमान सहा महिने तरी बंद झाला आहे. मध्यंतरी केंद्र सरकारने अशा प्रकरणात ठेवीदारांचे नुकसान होऊ नये म्हणून पाच लाखापर्यंतची रक्कम परत मिळेल असा कायदा केला. त्यानुसार प्रत्येक बँकेला ठेवींवर विमा काढणे बंधनकारक करण्यात आले. जाणकारांच्या म्हणण्यानुसार सहकार क्षेत्रातील अनेक बँका पैसे वाचवण्यासाठी पूर्ण ठेवींचा विमा काढत नाहीत. ही चलाखी रिझर्व्ह बँकेच्या लक्षात कशी येत नाही? यामुळे अलीकडच्या काळात ज्या बँकांवर निर्बंध आणले गेले त्याचे ठेवीदार निदान पाच लाख तरी परत मिळावे म्हणून अजूनही वणवण भटकत आहेत. मुंबईच्याच 'पंजाब अँण्ड सिंध'चे उदाहरण अगदी ताजे. याचाच अर्थ सर्व कायदे व नियम असूनसुद्धा त्यातून पळवाटा काढण्याचे काम बँक व नियामक संस्थांच्या पातळीवर राजरोसपणे सुरू आहे. त्याचा फटका मात्र सामान्यांना बसतो. सहकारात होणारी फसवणूक टळावी, हेच क्षेत्र अधिक सशक्त व्हावे यासाठी केंद्र सरकारने त्यांच्या पातळीवर हे खाते सुरू केले. त्याचा जोरदार प्रचार व प्रसार सध्या सुरू आहे. पण वास्तवात कोणताही बदल दिसून येत नसल्याचे या ताज्या घडामोडीने दाखवून दिले आहे. बँकेचे व्यवस्थापन जर आखून दिलेल्या मर्यादेच्या पलीकडे जाऊन आर्थिक व्यवहार करत असेल तर त्यावर प्रशासक बसवणे, ती बँक इतर बँकेत विलीन करणे असे पर्याय रिझर्व्ह बँकेसमोर असतात. वेळीच हे घडले तर गुंतवणूकदारांची परवड थांबूही शकते. यावर फार गंभीरपणे विचार होत नसल्याचे या घटनेतून दिसते. सरकार कोणतेही असो, त्याने गुंतवणूकदारांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य द्यायला हवे. नेमका त्याचाच अभाव जाणवतो. अशी घटना घडली की गुंतवणूकदारांच्या हिताचे पूर्ण रक्षण केले जाईल अशा घोषणा सातत्याने करायच्या व प्रत्यक्ष त्यांच्या पदरी काही पडणार नाही अशी कृती वेळ गेल्यावर करायची असेच सरकारचे धोरण राहिले आहे. आर्थिक शिस्त पाळली नाही म्हणून कारवाई झालेल्या बँकांच्या व्यवस्थापन मंडळाचे पुढे काय होते, हाही प्रश्न आहेच. अशा बँकांमध्ये जादा परताव्याच्या मिषाने पैसे गुंतवणारा मध्यमवर्ग वारंवार आर्थिक फसवणुकीच्या चक्रात अडकणे हे चांगले लक्षण नाही. हे टाळायचे असेलतर नियामक यंत्रणा आणखी तंदुरुस्त करणे गरजेचे. केंद्राने त्यासाठी पुढाकार घेतला तरच सहकाराला स्वतःच्या जाळ्यात ओढण्याच्या कृतीचे स्वागत होईल. अन्यथा दिवसागणिक ठेवीदारांचे रुदन ऐकावे लागेल. हा धोका न्यू इंडिया सह. बँकेच्या बुडण्यातूनही दिसतो आहे.

# आरटीई प्रवेश प्रक्रियेसाठी १० हजार विद्यार्थ्यांची निवड




■ठाणे : रटीई अंतर्गत होणाऱ्या २५ टक्के प्रवेश प्रक्रियेसाठी ठाणे जिल्ह्यातून १० हजार ४२९ बालकांची निवड झाली आहे. निवड झालेल्या बालकांचा प्रवेश २८ फेब्रुवारी पर्यंत निश्चित करावा असे आवाहन जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागाकडून करण्यात आले आहे.

आरटीई प्रवेश प्रक्रिया २०२५-२६ साठी १४ जानेवारीपासून सुरुवात झाली होती. हे प्रवेश अर्ज भरण्यासाठी सुरुवातीला २७ जानेवारीपर्यंत मुदत देण्यात आली होती. त्यानंतर प्रवेश अर्ज स्विकारण्याची मुदत २ फेब्रुवारी पर्यंत वाढविण्यात आली.

त्यानुसार, १४ जानेवारी ते २ फेब्रुवारी या कालावधीत ठाणे जिल्ह्यातील २५ हजार ७७४ बालकांचे आरटीई प्रवेशासाठी अर्ज प्राप्त झाले. त्यापैकी १० हजार ४२९ बालकांची आरटीई प्रवेशासाठी निवड झाली असल्याची माहिती आरटीई च्या अधिकृत संकेतस्थळावर देण्यात आली आहे.

यंदा ठाणे जिल्ह्यातील पंचायत समिती आणि महापालिका क्षेत्रातील ६२७ शाळा आरटीई प्रवेश प्रक्रियेसाठी पात्र ठरल्या असून ११ हजार ३२० जागांसाठी ही प्रवेश प्रक्रिया पार पडत आहे. या प्रवेश प्रक्रियेसाठी निवड झालेल्या बालकांचे प्रवेश निश्चित करण्याचे आवाहन पालकांना करण्यात आले आहे.

- निवड झालेल्या बालकांच्या कागदपत्र पडताळणी साठी तालुका आणि प्रभाग समिती स्तरावर समिती स्थापन करण्यात आली आहे. पडताळणी समिती कडे जाताना पालकांना मूळ कागदपत्रे आणि एक छायांकित प्रत घेऊन जायची आहे.
- जर पालक दिलेल्या तारखेस कागदपत्र पडताळणीसाठी उपस्थित राहू शकले नाही तर, त्यांना पुन्हा दोन संधी दिल्या जाणार आहेत.
- पडताळणी समितीने संबंधित बालकांची कागदपत्रे तपासणी करून प्रमाणित केल्यांनतर सदर बालकांना प्रवेश देण्याची सुविधा आरटीई संकेत स्थळावर केली आहे. तसेच पडताळणी समितीने तपासणी केलेले पात्र विद्यार्थी गटशिक्षणाधिकारी यांचे स्वाक्षरीचे पत्र घेवून शाळेत जातील. शाळा स्तरावर कोणत्याही कागदपत्रांची तपासणी करण्यात येणार नाही.
- पालकांनी केवळ दूरध्वनी वरील संदेशावर अवलंबून न राहता आरटीई संकेतस्थळावर वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे अवलोकन करावे.
- विहित मुदतीनंतर प्रवेशासाठी शाळेत जागा रिक्त असल्या तरीही कोणत्याही परिस्थितीत बालकाला प्रवेश दिला जाणार नाही, याची सर्व पालकांनी नोंद घ्यावी.
- विहित मुदतीनंतर प्रवेशासाठी कोणत्याही पालकांच्या अजार्ची किंवा निवेदनाची दखल घेतली जाणार नाही याची सर्व पालकांनी नोंद घ्यावी.
- विद्यार्थ्यांनी चुकीची माहिती भरून प्रवेश निश्चित केला आणि सदर बाब प्रशासनाच्या निदर्शनास आल्यास चुकीची माहिती भरुन दिशाभूल केल्या प्रकरणी आरटीई २५ टक्के प्रवेश कोणत्याही टप्प्यावर रद करण्यात येईल याची सर्व पालकांनी नोंद घ्यायची आहे.

## ठाणे जिल्ह्यात उत्पन्नाचे दाखले देण्याचे काम सुरु
### नागरीक, विद्यार्थ्यांची गैरसोय टाळण्यासाठी तलाठींचे आंदोलन मागे

■ठाणे : ठाणे जिल्ह्यातील तलाठी संघटनेने पुकारलेल्या काम बंद आंदोलनामुळे गेल्या २० दिवसांपासून उत्पन्न दाखला मिळत नसल्याने रुग्ण, विद्यार्थी आणि नागरिक हवालदिल झाले असून त्यांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन तलाठी संघटनेने अखेर सोमवारी काम बंद आंदोलन मागे घेतले आहे. यामुळे वैद्यकीय कामासाठी रुग्णांना, शिष्यवृत्ती व स्पर्धा परिक्षांचा अर्ज भरण्यासाठी विद्यार्थ्यांना आणि शासकीय कामांसाठी नागरिकांना उपत्न्न दाखला मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. ठाणे, कल्याण, मुरबाड, उल्हासनगर, अंबरनाथ, भिवंडी आणि शहापूर असे एकूण सात तालुके ठाणे जिल्ह्यात येतात. तालुका स्तरावरील तहसील कार्यालयातून नागरिकांना उत्पन्न दाखला, रहिवास प्रमाणपत्र तसेच इतर आवश्यक प्रमाणपत्र तयार करून दिली जातात. यातील उत्पन्नाच्या दाखल्यासाठी नागरिकांनी अर्ज केल्यास त्याची तपासणी तलाठींकडून केली जाते. ठाणे जिल्ह्यात दररोज तीनशे ते चारशे उत्पन्न दाखले दिले जातात. प्रत्येक तालुक्यात दररोज ५० ते ६० उत्पन्न दाखल्यांसाठी अर्ज येतात. अर्जदाराने दिलेले स्वयंघोषणापत्र आणि कागदपत्रांच्या आधारे तलाठी उत्पन्न दाखला तयार करून तो पुढे तहसीलदारांकडे पाठवितात. त्याआधारे नागरिकांना उत्पन्नाचे दाखले तहसील कार्यालयातून उपलब्ध करून दिले जातात. तलाठींच्या अहवालानुसार दाखला देण्यात येत असल्याचा उल्लेख उत्पन्नाच्या दाखल्यावर केला जातो. यामुळे त्या दाखल्यात खोटी माहिती आढळून आली तर, संबंधित तलाठींवर कारवाई होते. काही ठिकाणी तलाठींवर गुन्हेही दाखल झालेले आहेत. या कारवाईच्या भितीमुळे तलाठींनी उत्पन्न दाखल्यासाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या तपासणीचे काम बंद केले होते. महाराष्ट्र राज्य तलाठी संघटनेच्या ठाणे जिल्हा विभागाने हे आंदोलन पुकारले होते. या आंदोलनामुळे ठाणे जिल्ह्यात गेल्या २० दिवसांपासून उत्पन्न दाखल्यांचे काम ठप्प झाले होते. दाखल्याविना रुग्ण, विद्यार्थी आणि नागरिकांची कामे खोळंबली होती. यावरून तलाठींवर टिका होत होती.

## डोंबिवलीत सावरकर रस्ता, नेहरू रस्त्यावर गळक्या जलवाहिनींचे ओहोळ



पादचाऱ्यांना रस्त्यावरील पाण्यामुळे वळसा घेऊन जावे लागते. दुचाकी स्वार या काँक्रीट रस्त्यावरील पाण्यामुळे दुचाकीसह घसरून पडत आहेत. जीवंत वीज वाहिनीजवळून हे पाणी वाहत आहे. काही दुर्घटना घडण्यापूर्वी पाण्याची ही गळती पालिका अधिकाऱ्यांनी थांबवावी अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.नेहरू रस्त्यावर ठाकुर्ली पुलाच्या पूर्व बाजुकडील पायथ्याजवळ मागील अनेक वषार्पासून भूमिगत जलवाहिनीमधून गळती होत आहे. पालिकेने अनेक वेळा या गळतीवर प्रभावी उपाययोजना केल्या, पण ही गळती थांबत नाही. गेल्या काही महिन्यापूर्वी पालिकेने केलेल्या दुरुस्तीमुळे ही गळती थांबली होती. आता पुन्हा ही पाणी गळती सुरू झाली आहे. हा पाण्याचा प्रवाह स. वा. जोशी शाळा, ब्लॉसम शाळेसमोरील रस्त्यावरून वाहतो. सकाळ, संध्याकाळ पालक याठिकाणी मुलांना शाळेत सोडणे, घरी नेण्यासाठी येतात. त्यांना या रस्त्यावरील पाण्याचा त्रास होतो.

■डोंबिवली : डोंबिवली पूवेर्तील सर्वाधिक वर्दळीच्या सावरकर रस्ता आणि नेहरू रस्त्यावर ठाकुर्ली उड्डाण पुलाजवळ भूमिगत जलवाहिन्यांना गळती लागली आहे. काही ठिकाणी भूमिगत सांडपाणी वाहून नेणाऱ्या चेंबरमधून पाणी सीमेंट कॉंक्रीटच्या रस्त्यावर वाहून येत आहे. दररोज चोवीस तास हे पाणी रस्त्यावरून वाहत असल्याने पादचारी, प्रवाशांची गैरसोय होत आहे.

सावरकर रस्ता हा पूर्व भागातील सर्वाधिक वर्दळीचा रस्ता आहे. या रस्त्याचे अलीकडे सीमेंट कॉंक्रीटीकरण करण्यात आले आहे. या रस्त्यावर डोंबिवली नागरी सहकारी बँकेसमोरील भागात भूमिगत जलवाहिनीमधून पाण्याची गळती होत आहे. हे पाणी कॉंक्रीटच्या रस्त्यावरून वाहत असते. हे पाणी रस्त्याच्या कडेला असलेल्या महावितरणच्या मीनी पीलरमधील जीवंत वीज वाहिन्यांमधून वाहत असते. जीवंत वीज वाहिन्या आणि पाण्याचा संपर्क येऊन शॉर्ट सर्किट होण्याची भीती परिसरातील नागरिकांना वाटते. एक महिना झाला पालिका अधिकारी, महावितरणचे अधिकारी या महत्वपूर्ण विषयाकडे लक्ष देत नाहीत. त्यामुळे स्थानिक रहिवासी नाराजी व्यक्त करत आहेत.


ठाकुर्ली पुलावर पूर्व बाजुने जाणाऱ्या वाहन चालकांना या गळक्या जलवाहिनी भागातून मार्ग काढताना कसरत करावी लागते. या सततच्या पाण्यामुळे आणि वाहनांच्या वर्दळीमुळे या भागातील रस्ता खराब होऊन त्याला खड्डे पडतात. या खड्ड्यातून वाट काढत वाहन चालकांना जावे लागते. दोन महिन्यापूर्वी या भागातील भूमिगत जलवाहिन्यांमधील गळती थांबविण्यात पालिका अभियंत्यांना यश आले होते. परंतु, ही गळती आता पुन्हा सुरू झाली आहे.

पालिका अधिकाऱ्यांनी तत्पर हालचाली करून सावरकर रस्ता, नेहरू रस्त्यावरील पाण्याची गळती थांबविण्यासाठी पुढाकार घेण्याची मागणी नागरिक करत आहेत. पालिकेच्या पाणी पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्याने सांगितले, या दोन्ही ठिकाणच्या पाण्याची गळती थांबविण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. सावरकर रस्त्यावरील, नेहरू रस्त्यावरील जलवाहिन्या भूमिगत असल्याने रस्ता फोडून मग हे काम करावे लागणार आहे.

## मासुंदा तलावाला दुरवस्थेचा विळखा, नागरिकांना अस्वच्छतेचा त्रास

■ठाणे : तलावांचे शहर म्हणुन प्रसिद्ध असणाऱ्या ठाणे शहरातील मुख्य तलाव परिसरातच घाणीचे साम्राज्य असल्याचे पहायला मिळत आहे. मासुंदा तलाव परिसरात सध्या उंदरांचा सुळसुळाट मोठ्या प्रमाणात वाढल्याने तलावाजवळ असलेल्या पाणपोईची दुरवस्था झाली आहे. तसेच नागरिकांसाठी बसण्यासाठी ठेवलेले सिमेंटचे बाकडे तुटलेल्या अवस्थेत असून त्यांची देखभाल केली जात नसल्याचे चित्र आहे.

मुख्यमंत्र्यांचे बदलते ठाणे या उपक्रमांतर्गत विविध उपक्रम राबविले जात असतात. तसेच मासुंदा तलाव हे ठाणे शहराचे केंद्रबिंदू आहे. या ठिकाणी पर्यटकांसाठी नौकाविहार, बैठक व्यवस्था, रोषणाई, लहान मुलांसाठी विविध आकर्षक खेळ असे विविध मनोरंजनाची साधने याठिकाणी आहेत. त्यामुळे याठिकाणी मोठ्यासंख्येने पर्यटक येतात. परंतु ठाणे



महापालिकेच्या दुर्लक्षित पणामुळे मासुंदा तलाव परिसरात घाणीचे साम्राज्य पसरत आहे. तलाव परिसरात असलेल्या पाणपोईजवळ उंदरांचा सुळसुळाट वाढल्याने पाणपोईची दुरवस्था झाली आहे. तसेच परिसरात नागरिकांना बसण्यासाठी बांधलेले सिमेंटचे बाकडे तुटलेल्या अवस्थेत असल्याचे दिसून येत आहे.

काही नागरिक या ठिकाणी उंदरांना पाव आणि इतर पदार्थ खायला घालत असतात. त्यामुळे शिळे पदार्थ सर्वत्र पसरलेले असते. त्याचप्रमाणे नागरिकांकडून तलावातील पाण्यामध्ये देखील कचरा टाकला जातो. यामुळे काही वेळेस या तलावातील पाण्याचा दुर्गंध येत असतो. तसेच पावसाळ्यात मासुंदा तलाव परिसरात पावसाच्या पाण्याचा निचरा होत नसल्याने पाणी तिथेच साचून राहते. याच पाण्यातून पादचाऱ्यांना मार्गक्रमण करावे लागते. त्यात पदपथांवर गर्दुल्ल्यांचा वावर वाढल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण झाला आहे. अनेक गर्दुल्ले पदपथावरच शिळे अन्न फेकून देतात. काही वेळा पदपथांवरच विष्ठा केलेली असते त्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरते.पदपथांवर फेरीवाल्यांनी अतिक्रमण केल्याने नागरिकांना चालण्यासाठी पुरेशी जागा मिळत नाही. गर्दीच्या वेळी या समस्येत अधिक भर पडते. स्वच्छ ठाणे अभियान राबवणाऱ्या ठाणे महानगरपालिकेने या भागातील अस्वच्छतेकडे दुर्लक्ष केल्याने स्थानिक नागरिकांमध्ये संताप आहे.

## ग्रामीण भागात दुषित पाणी पुरवठा
## १३२ ग्रामपंचायतींना मिळाले पिवळे कार्ड

■ठाणे : जिल्ह्याच्या ग्रामीण भागात रस्ते, पाणी टंचाईची समस्या आणि आरोग्य सेवा सुधारण्यावर भर देत असतानाच दुसरीकडे ग्रामीण भागातील १३२ ग्रामपंचायतीतील पाण्याचे स्त्रोत दुषित असल्याची माहिती स्वच्छता सर्वेक्षण अभियानच्या माध्यमातून समोर आली आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.



ठाणे जिल्हा परिषदेच्या माध्यमातून पाचही तालुक्यातील नागरिकांना आरोग्य सुविधा, शिक्षण तसेच शुद्ध पाणी पुरवठा करण्यासाठी विविध पातळीवर प्रयत्न केले जातात. या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषदेच्यावतीने स्वच्छता सर्वेक्षण अभियान राबविण्यात आले होते. या अभियानाद्वारे जलस्त्रोतांची पाहणी केली जाते. त्यानुसार,गावांमधील नळ योजना, विहिरी, हातपंप या पाण्याच्या स्त्रोतांची पाहणी करुन संबधीत ग्रामपंचायतींच्या हद्दीतील पाण्याचा दर्जा ठरवण्यात येतो. पाण्याच्या दर्जानुसार संबधीत ग्रामपंचायतींना लाल, पिवळे आणि हिरवे कार्ड दिले जाते. ज्या ग्रामपंचायतींमध्ये अतिदूषित पाण्याचा पुरवठा होतो, त्या ग्रामपंचायतींना लाल कार्ड, कमी दूषित पाण्याचा पुरवठा होणाऱ्या ग्रामपंचायतींना पिवळे आणि स्वच्छ पाण्याचा पुरवठा होणाऱ्या ग्रामपंचायतींना हिरवे कार्ड दिले जाते. तर, ज्या ग्रामपंचायतींच्या हद्दीमध्ये चार वर्षांच्या कालावधीत एकदाही जलजन्य आजाराची नोंद झाली नाही. त्या गावांना चंदेरी कार्ड दिले जाते.

ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात जलस्त्रोतांची पाहणी करण्यात आली. यामध्ये पाच तालुक्यातील १३२ ग्रामपंचायतीत जलस्त्रोत मध्यम दुषित असल्याचे आढळून आले आहेत. या ग्रामपंचायतींच्या जलस्त्रोतांमध्ये दूषित पाण्याचा मोठ्या प्रमाणात निचरा होत आहे. त्यामुळे या ग्रामपंचायतींच्या हद्दीमध्ये राहणाऱ्या नागरिकांना दूषित पाणी प्यावे लागत आहे. तर, उर्वरित २८२ ग्रामपंचायतीत शुद्ध पाणी पुरवठा होत असल्याचा दावा जिल्हा परिषद प्रशासनाकडून करण्यात आला आहे.

## कल्याणमध्ये ३ महिन्याच्या बालकाला पालकांनी बेवारस स्थितीत सोडले

■कल्याण : कल्याण पश्चिमेतील जोशीबाग भागात एका घराच्या समोर मोकळ्या जागेत एक तीन वर्षाच्या बालकाला त्याच्या आई, वडिलांनी शनिवारी सकाळी बेवारस स्थितीत सोडून दिले आहे. हे बालक एकटेच रस्त्यावर रडत असल्याने एका सामाजिक कार्यकर्ता महिलेने याप्रकरणाची महात्मा फुले पोलीस ठाण्यात तक्रार केल्यानंतर पोलिसांनी बालकाला बेवारस स्थितीत सोडून देणाऱ्या अनोळखी व्यक्तिंविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

कल्याण पश्चिमेतील जोशी बागेतील परवेज अल्ली सय्यद यांच्या घरासमोर, सय्यद पॅलेस, न्यू हायस्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालय येथे शनिवारी सकाळी साडे नऊ वाजण्याच्या दरम्यान रस्त्यावर एक तीन वषार्चे बालक बेवारस स्थितीत असून ते रडत असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्त्या निलीमा मंगेश सोनवणे यांना मिळाली. परिसरातील रहिवासी, पादचारी नागरिक या बालकाभोवती जमा झाले. या बाळाला याठिकाणी कोणी सोडून दिले याचा शोध घेण्यात आला. पण परिसरात कोणीही आढळून आले नाही.

त्यामुळे आपल्या मुलाचा सांभाळ करण्याऐवजी त्याला रस्त्यावर बेवारस स्थितीत सोडून देऊन त्याच्या पालकांनी त्याचा परित्याग करण्याचा प्रयत्न असल्याचे लक्षात आल्यावर सामाजिक कार्यकर्त्या निलीमा सोनवणे यांनी महात्मा फुले पोलीस ठाण्यात याप्रकरणाची तक्रार केली. पोलिसांनी त्यांच्या तक्रारीवरून अज्ञात पालकांविरुध्द अल्पवयीन मुलाची काळजी व संरक्षण कायद्याने गुन्हा दाखल केला आहे.




याप्रकरणाची माहिती मिळाल्यानंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर साबळे, साहाय्यक पोलीस निरीक्षक विनोद पाटील, महिला पोलीस उपनिरीक्षक घाटगे, प्रतिभा माळी यांनी घटनास्थळी भेट दिली. सदर मुलाचा ताबा घेण्यात आला. शासकीय बाल संरक्षण व सुधार गृहात या बालकाला ठेवण्याची व्यवस्था केली जाणार असल्याचे समजते. या मुलाला जोशी भागातील रस्त्यावर कोणी आणून सोडले याचा तपास पोलिसांनी सुरू केला आहे.

## ठाण्यातील तीन हात नाक्याचा रस्ता निमुळता बांधकामांमुळे एक मार्गिका अरुंद
## दुसरी मार्गिका रुंद अरुंद मार्गिकेमुळे होतेय वाहतूक कोंडी

■ ठाणे : तीन हात नाका भागातून मुलूंडच्या दिशेने जाणाऱ्या मार्गाच्या मध्यभागी मेट्रोची मार्गिका उभारण्यात आलेली असली तरी ठाण्याहून मुलुंडच्या दिशेने जाणारी मार्गिका अरुंद तर, मुलुंडहून ठाण्याकडे येणारी मार्गिका रुंद दिसत आहे. मुलुंड दिशेने जाणाऱ्या मार्गिकेलगत बांधकामे आणि बेकायदा टपऱ्या असून यामुळे ही मार्गिका निमळुती झाल्याने येथे कोंडीची समस्या निर्माण होत आहे. त्याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असून भविष्यात ही समस्या आणखी डोकेदुखी ठरण्याची चिन्हे आहेत.

ठाणे शहरातील सर्वाधिक वर्दळीचा रस्ता म्हणून तीन हात नाका चौक ओळखला जातो. पूर्व द्रुतगती महामार्गावरील हा चौक वाहतुकीमुळे अतिशय गजबजलेला असतो. या चौकाला चार सेवा रस्ते, सहा मुख्य जोडण्यात आले आहेत. ठाणे स्थानक तसेच मुंबई शहरातील वाहतूकीसाठी हा मार्ग महत्वाचा मानला जातो. या मार्गावरून ठाणे, घोडबंदर, मुंबई उपनगर, मुलुंड, भांडूप, वागळे इस्टेट भागातील नोकरदार वर्ग वाहतूक करतो. या भागात काही शासकीय तसेच खासगी कंपन्यांची कार्यालये, मॉल आहेत. याशिवाय, लोकवस्ती आणि महाविद्यालय आहे. यामुळे दररोज हजारो नागरिक, विद्यार्थी या भागातून पायी ये-जा करतात. काही दिवसांपूर्वीच याच चौकाजवळ सामाजिक कार्यकर्त्या पुष्पा आगाशे यांना एका बसगाडीने धडक दिली होती. त्यानंतर बसगाडी चालकाने त्यांना वैद्यकीय मदत करण्याऐवजी तेथून



पळ काढला.

अपघातात आगाशे यांचा मृत्यू झाल्यानंतर परिसरातील पादचारी आणि वाहन चालकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. त्यातच, येथील बेकायदा टपऱ्या आणि बांधकामांमुळे होणाऱ्या कोंडीचा मुद्दा देखील उपस्थित होऊ लागला आहे. येथील मुलुंड, वागळे इस्टेटच्या दिशेने वाहतुक करणाऱ्या मार्गिकेवरील इटर्निटी परिसरात सेवा रस्ता आणि मुख्य रस्त्या लगत मोठ्याप्रमाणात अनधिकृत टपऱ्या, गाळे आणि उपाहारगृह उभारण्यात आले आहेत. या बांधकामांमुळे ठाणे स्थानकाहून मुलुंड चेक नाक्याच्या दिशेने जाणारी मार्गिका निमुळती झाली आहे. यामुळे सकाळ आणि सायंकाळच्या वेळेत याठिकाणी वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत आहे.

या चौकात सर्वाधिक टपऱ्या या लांब पल्ल्याच्या ठिकाणी जाणाऱ्या खासगी बसगाड्यांच्या आसन नोंदणीच्या आहेत. दिवसभर या टपऱ्यांवर बसगाड्यांमध्ये आसन व्यवस्थेच्या नोंदणीसाठी नागरिक गर्दी करतात. त्यांची वाहनेही या टपऱ्यांजवळ उभी असतात. त्यामुळे येथून वाहतुक करणाऱ्या नागरिकांना अतिशय अरुंद मार्गिका उपलब्ध होते. याच मार्गावर मेट्रो मार्गिकेच्या उभारणीचे काम सुरू आहे. त्यासाठी रस्त्याच्या मध्यभागी मेट्रोची मार्गिका उभारण्यात आली आहे. तरीही ठाण्याहून मुलूंडच्या दिशेने जाणारी मार्गिका अरुंद तर, मुलुंडहून ठाण्याकडे येणारी मार्गिका रुंद दिसत आहे. मुलुंड दिशेने जाणाऱ्या मार्गिकेलगत बांधकामे आणि बेकायदा टपऱ्या असून यामुळे ही मार्गिका निमुळती झाल्याने येथे कोंडीची समस्या निर्माण होत आहे.

याबाबत महापालिकेचे नौपाडा-कोपरी प्रभागाचे साहाय्यक आयुक्त सोपान भाईके यांना विचारले असता, बांधकामांबाबतची माहिती घेऊन सांगतो असे त्यांनी स्पष्ट केले.

## डोंबिवलीतील विकासक जगदीश वाघ यांच्या मालकीच्या सदनिका सील
## मालमत्ता कर थकविल्याने फ प्रभागाची कारवाई



■डोंबिवली: वारंवार नोटीस पाठवुनही मालमत्ता कराची थकित रक्कम भरणा न केल्याने डोंबिवलीतील विकासक जगदीश वाघ यांच्या नावे असलेल्या डोंबिवली पूर्व रेल्वे कॉलनीमधील सद्गुरू इमारतीमधील दोन सदनिका सील करण्यात आल्या आहेत. तसेच, ठाकुर्ली खंबाळपाडा येथील कोळीवाडा हॉटेल चालकाने मालमत्ता कराची रक्कम थकविल्याने त्यांचे हॉटेल सील करण्यात आले, अशी माहिती कल्याण डोंबिवली पालिकेच्या फ प्रभागाच्या साहाय्यक आयुक्त हेमा मुंबरकर यांनी दिली.

डोंबिवली पूर्व पाथर्ली भागातील रेल्वे कॉलनीमध्ये सदगुरू इमारतीमध्ये विकासक जगदीश वाघ यांच्या नावे क्रमांक ४०१, ७०१ अशा दोन सदनिका आहेत. या सदनिकांचा मागील अनेक वर्षांचा मालमत्ता कर विकासकाने पालिककडे भरणा केलेला नाही. ही रक्कम २० लाख ९६ हजार ४३३ रुपए आहे. हा थकित रकमेचा कर भरणा करावा म्हणून विकासकाला यापूर्वी वारंवार नोटिसा पाठविण्यात आल्या आहेत. संबंधितांकडून कर भरण्याविषयी प्रतिसाद न मिळाल्याने विकासक जगदीश वाघ यांच्या सदगुरू इमारतीमधील दोन्ही सदनिका सील करण्यात आल्या आहेत, अशी माहिती साहाय्यक आयुक्त मुंबरकर यांनी दिली.

तसेच, ठाकुर्ली खंबाळपाडा भागातील कोळीवाडा हॉटेलच्या मालकाने मालमत्ता कराची एक लाख ७३ हजार २७२ रूपयांची मालमत्ता कराची रक्कम थकविल्याने या हॉटेल चालकाचे हॉटेल सील करण्यात आले आहे. या मालकाला पालिकेने थकित कर भरणा करण्यासाठी वारंवार नोटिसा पाठविल्या होत्या. त्याची दखल न घेण्यात आल्याने हे हॉटेल सील करण्यात आले, अशी माहिती मुंबरकर यांनी दिली.

या कारवाईत साहाय्यक आयुक्त हेमा मुंबरकर यांच्यासह अधीक्षक महेश पाटील, वरिष्ठ लिपिक दौलत जांभेकर, शशिकांत म्हात्रे यांचे पथक सहभागी झाले होते. आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड, मालमत्ता कर उपायुक्त स्वाती देशपांडे यांनी चालू आणि थकित मालमत्ता कर वसुलीचे आदेश दिले आहेत. या आदेशाप्रमाणे निवासी, वाणिज्य मालमत्ता धारकांनी थकित कर भरणा केला नसेल तर त्यांच्या मालमत्ता सील करण्यात येत आहेत. मालमत्ता सील करूनही थकबाकीदार मालमत्ता कर भरणा करत नसतील तर वरिष्ठांच्या आदेशाप्रमाणे संबंधित मालमत्तांचा लिलाव जाहीर करून येणाऱ्या रकमेतून थकित मालमत्ता कर वसूल केला जाणार आहे.

''फ प्रभागात थकबाकीदारांकडील मालमत्ता कर वसुलीची मोहीम सुरू आहे. विकासक वाघ यांच्या नावे थकित मालमत्ता कर आहे. कोळीवाडा हॉटेलकडे मालमत्ता कर थकित आहे. वारंवार नोटिसा देऊनही या दोन्ही थकबाकीदारांकडून कर भरणा केला जात नसल्याने त्यांच्या मालमत्ता सील करण्यात आल्या आहेत. ''

**-हेमा मुंबरकर साहाय्यक आयुक्त,फ प्रभाग, डोंबिवली.**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई 400063 (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com